**Pudhari 28.03.20**

# पोलिसांची अशीही सामाजिक बांधिलकी

## उपाशी असलेल्या कुटुंबाला मदतीचा हात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शुक्रवारी साडेचारच्या सुमारास पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षातील फोन खणाणला. साहेब, मी अजय साळुंखे बोलतो आहे. मी अडचणीत असून, मला तुमची मदत हवी, असे फोनवरील व्यक्तीने सांगितले. ही माहिती तत्काळ बिबवेवाडी पोलिस ठाण्याला देण्यात आली.

कॉल प्राप्त होताच पोलिस ठाण्याचे कर्मचारी अमृत पाटील, हवालदार तणपुरे यांनी सी. आर. मोबाईलमधून कॉलपॉइंटचे ठिकाणी गेले. तेथे साळुंखे यांना भेटून त्यांच्या तक्रारीबाबत चौकशी केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी बिगारी कामगार आहे. माझ्या कामावरच माझ्यासह माझी पत्नी व मुलांचा उदरनिर्वाह होतो. लॉकडाऊनमुळे हाताला काम नाही, त्यामुळे आम्ही उपाशी आहोत, कोणीही काही खाल्ले नाही. आम्हाला खाण्यास काहीतरी हवे आहे.

पोलिसांनी नजीकच्या दुकानातून तांदूळ, साखर, चहा पावडर, बटाटे, तेलाची पिशवी, दूध व भाजीपाला अशा जीवनावश्यक वस्तू आणून दिल्या. तसेच अग्निशामक दलाचे कर्मचारी मंगेश बोंबले यांनी कुटुंबास १,०००/- रुपये रोख मदत व बिस्किटचे पुडे अशी मदत केली आहे. कठीणप्रसंगी पोलिसांनी केलेल्या मदतीमुळे या वेळी साळुंखे यांचे डोळे भरून आले होते. त्यांनी पोलिसांचे आभार मानले.

## भुकेल्यांच्या मदतीला पुणेकरांचे हात

**पुणे :** कोरोनाच्या वाढत्या प्रसारामुळे संपूर्ण शहर लॉकडाऊन झाले आहे. भुकेने व्याकूळ झालेले कामगार आणि विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शहरातील शेकडो हात गेल्या दोन दिवसांपासून पुढे आले आहेत. त्यामुळे बंदच्या काळात या भुकेल्यांची भूक भागू लागली असून हे हात त्यांच्यासाठी 'मसीहा' ठरले आहेत. जय जिनेंद्र या स्वयंसेवी ग्रुपच्या वतीने गेल्या तीन दिवसांपासून दुपारी आणि संध्याकाळी वसतिगृहात राहणारे विद्यार्थी, कामगार, तसेच रस्त्यावरील भिकारी अशा सुमारे ३०० ते ३५० जणांना जेवण आणि पाणी देण्यास सुरुवात केली आहे. संचारबंदीच्या काळात ड्युटीवर असलेले पोलिस, तसेच पोलिस अधिकारी यांनादेखील जेवण, चहा, पाण्याची बाटली देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हे सर्व काम संस्थेचे कार्यकर्ते यांच्याबरोबर गणेश डांगी, संजय करपे यांच्या मार्गदर्शनखाली सुरू आहे.

## ज्येष्ठ नागरिकांना साहाय्य

**पुणे :** लॉकडाऊनदरम्यान ज्येष्ठ नागरिकांना कसलाही त्रास होऊ नये, जीवनावश्यक वस्तू, औषधे त्यांना घरबसल्या मिळावीत, या हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने (मनविसे) ज्येष्ठ नागरिक साहाय्य उपक्रम सुरू केला आहे. शहरातील विविध भागातील कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी असून, कोणतीही मदत लागल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**Sakal 31.03.20**

# आता पोलिसही बनले बेघरांसाठी अन्नदाता

**गोखलेनगर, ता. ३० :** नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरातील विविध परिसरांत पोलिस रात्रंदिवस बंदोबस्ताचे काम करीत आहेत. या दरम्यान, त्यांना काही सामाजिक संस्थांकडून जेवणाचे पॅकेट, पाण्याच्या बाटल्या मदत स्वरूपात दिल्या जात आहेत. मात्र, शिवाजीनगर पोलिस चौकातील पोलिस या वस्तू बेघरांना देऊन त्यांची भूक भागवित आहेत.

प्रसंगी कठोर पावले उचलणाऱ्या खाकी कपड्यातील या अन्नदात्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संचारबंदीमुळे सर्व व्यवसाय बंद झाले आहेत. यामुळे हातावर पोट असणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत.

शिवाजीनगर भागात असलेल्या बेघर नागरिकांना पोलिस माणुसकीच्या नात्याने मदत करीत आहेत. सामाजिक संस्थांकडून मिळणारे जेवणाचे पॅकेट, बिस्कीट, पाण्याच्या बॉटल ते गरजूंना देत आहेत. दरम्यान, या भागांत विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांवर पोलिसांकडून कारवाई होत आहे. बाहेर पडणाऱ्यांना तोंडी सूचना दिल्या जात आहेत. शिवाजीनगर पोलिस चौकीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलिस कर्तव्य बजावत आहेत.

**Lokmat 27.03.20**



**गणवेशातलाही वाहतो माणुसकीचा झरा :** [illegible]

### रतनलाल सी. बाफना ज्वेलर्सकडून ५ लाखांची मदत

पुणे : संपूर्ण देशभरात सध्या कोरोना [illegible]

**Lokmat 28.03.20**

# आम्ही आणलेल्या डब्यातील घास तुमच्यासाठी

## रस्त्यावरील कुटुंबांना घरचे जेवण : कोंढवा वाहतूक पोलिसांचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दरवेळी रागवणारे, इतरांवर हात उगारणारे, समज देऊनही न ऐकणाऱ्यांना अद्दल घडविणारे गरज पडल्यास आपल्या लाठीचा प्रसाद देणारे पोलीस सर्वांना माहिती असतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून कोंढव्यातील रस्त्यावर राहणाऱ्या व्यक्तींना आपल्या डब्यातील घास काढून देणाऱ्या पोलिसांनी खाकी वर्दीत दडलेल्या माणसुकीचे दर्शन घडवले आहे. कोंढवा वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सोबत आणलेल्या डब्यातील जेवण इतरांना देऊन अनोखा संदेश समाजात पोहोचवला आहे.

कोरोनासारख्या जीवघेण्या आजाराचा संसर्ग टाळण्यासाठी शहरात संचारबंदी जाहीर करण्यात आली. १४ दिवस लॉकडाऊन करण्याची वेळ आल्याने सर्वांचे धाबे दणाणले. बहुतांशी नागरिकांनी किराणा मालाचा साठा करत येणाऱ्या दिवसाला सामोरे जाण्याची तयारी सुरु केली. मात्र या सगळ्यात हातावर पोट असणाऱ्या, दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणाऱ्या व्यक्तींसमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. कोंढवा भागातील फेरीवाले, रस्त्यावर छोट्या मोठ्या वस्तू विकून गुजराण करणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींना मुलांच्या पोटाची खळगी कशी भरावी, याचा प्रश्न पडला. शहरात सगळीकडे सामसूम, शुकशुकाट असल्याने कुठे काय मिळेल याची खात्री नव्हती. ही गंभीर परिस्थिती कोंढवा वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या लक्षात आली आणि त्यांनी या रस्त्यावरील लोकांना जेवण देण्यास सुरुवात केली.

'एक डबा आमच्यासाठी सोबत आणलेले डबे तुमच्यासाठी' हा उपक्रम त्यांनी हाती घेतला. आपल्या डब्यातील घास त्या लहान मुलांना भरवला. यामुळे त्या कुटुंबातील व्यक्तींनी पोलिसांचे आभार मानले. गेल्या दोन दिवसांपासून कोंढवा वाहतूक विभागातील ४० पोलीस कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले आहेत. यात डब्यात येताना कुणी काय आणायचे याचे नियोजन केले जाते. एखादा पोलीस कर्मचारी चपात्या घेऊन येतो, तर कुणी भाजी घेऊन येतो, कुणी भात तर कुणी डाळ अशा पद्धतीने सर्वांनी यात सहभाग घेतला आहे. विशेष म्हणजे हे सर्व पोलीस कर्मचारी या लोकांसोबत जेवायला बसतात. त्यामुळे पोलिसांच्याबद्दल त्यांच्या मनात असलेली प्रतिमा बदलण्यास मदत होणार आहे. संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत नॉर्मल त्या दोन्ही कुटुंबांची जबाबदारी कोंढवा वाहतूक विभागाने घेतली आहे.

याबरोबरच अनेक गरजू कुटुंबे असल्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांना शिधा किंवा धान्यवाटप करणार असल्याचे कोंढवा वाहतूक विभागाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सांगितले.



कोंढव्यात पोलीस नागरिकांना आपल्या डब्यातील घास देत आहेत.

> कोंढवा वाहतूक विभागासमोरील लहान मुले असणाऱ्या दोन कुटुंबांकडे चौकशी केली असता, त्यांच्याकडे धान्य तसेच अन्य जीवनावश्यक साहित्याचा अभाव असल्याचे दिसून आले. यानंतर वाहतूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी या दोन्ही कुटुंबांसाठी १५ दिवस पुरेल इतके धान्य दिले. तसेच त्यांना सद्य:स्थितीत कशी काळजी घ्यावयाची हे समजावून सांगून मास्कचे वाटपसुद्धा केले.
>
> **- वाहतूक पोलीस कर्मचारी,** कोंढवा विभाग

**Lokmat 11.04.20**

## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप : पोलिसांच्या माणुसकीचा कामगारांना प्रत्यय

# वेळेला धावून आला खाकी वर्दीतील माणूस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरोनाचा संसर्ग वाढत** असल्यामुळे शहरात हातावर पोट असणाऱ्या मजुरांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यांना दोन वेळच्या जेवणासाठी मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे. अशा वेळी पोलिसांनी त्यांना मदत केली असून त्यांच्या दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न सोडवला आहे. येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शांती मंडळ संस्था येरवडा पोलीस ठाण्याच्यावतीने फुलेनगर झोपडपट्टी येरवडा पोलिसांनी केलेल्या मदतीबद्दल येथील गरीब व गरजू अशा २०० नागरिकांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू यांचे वाटप केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

**पुणे :** एरवी करड्या शिस्तीचा आणि रागीट म्हणून ओळखला असणारा पोलीस अधिकारी जेव्हा कुणी आपल्यातलीच एक सर्वसामान्य माणूस आहे. असे कळताच नवल वाटल्याशिवाय राहत नाही. सध्या कोरोनाने सर्वांना जेरीस आणले असताना अशा परिस्थितीत ज्यांचे हातावर पोट आहे. त्या कामगार, मजुरांना पोलिसांनी अन्नधान्य, तसेच काही जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे. तसेच कुठल्याही क्षणी नागरिकांच्या मदतीला जाण्याची तयारी त्यांनी दाखविली आहे.

लॉकडाऊनच्या विश्वेवाडी पोलिसांकडून एका गरजू महिला मदत केली. मंगला गोडसे असे त्या महिलेचे नाव असून त्या अपर इंदिरानगर येथे राहतात. या महिलेची दोन्ही मुले बाहेरगावी गेल्याने तिला ऐनवेळी मोठ्या समस्येला सामोरे जावे लागले. तिच्या घरातील किराणामाल व सिलिंडर संपल्याचे तिने पोलिसांना सांगितले. यामुळे आपल्यावर उपासमारीची वेळ येत असल्याचे तिने सांगितले. यानंतर ठाण्याचे सहायक पोलीस उपनिरीक्षक अमृत पाटील, पोलीस हवालदार तनपुरे, पोलीस शिपाई गुजर यांनी पोलीस ठाणे हद्दीतील संबंधित गॅस एजन्सीच्या मालकांना फोन करून सिलिंडरची व्यवस्था केली.

तसेच त्या महिलेस आर्थिक मदत करून तिला किराणा माल व भाजीपाला घेऊन देण्यास मदत केली. अशा पद्धतीनेच येरवड्यातील एका परप्रांतीय नागरिकाने पोलिसांकडे मदतीची विनंती केली. मूळचा उत्तर प्रदेशातील असणाऱ्या रंजितकुमार याने शहर पोलीस आयुक्तालयामार्फत केलेल्या केंद्राशी संपर्क साधून पोलिसांची मदत मागितली. यावेळी येरवडा पोलीस त्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलीस नाईक श्रीखंडे यांच्यामार्फत अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तू देऊन व्यक्तीला मदत केली. त्याचबरोबर एका महिलेलादेखील अनावश्यक वस्तूंचे वाटप करून सहकार्य केले.

**Mata 06.04.20**

# घरकाम करणाऱ्या महिलांना धान्यवाटप

**पुणे :** दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि अवनी संस्था यांच्यातर्फे दिव्यांग, वृद्ध व गरजूंना अन्नदान आणि अन्नधान्य देण्यात येत आहे. उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील वाटप दीपबंगला चौक येथील घरकाम करणाऱ्या महिलांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.

आपल्या माहितीत कोणी दिव्यांग, वृद्ध आणि गरजू असल्यास संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे रघुनाथ येमुल गुरुजी आणि अवनी संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले आहे. नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांनी या उपक्रमासाठी सहकार्य केले आहे.



**दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि अवनी संस्थेतर्फे दीपबंगला चौक येथील घरकाम करणाऱ्या महिलांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.**

**Lokmat 23.04.20**

## लोकांनी घरी राहावे म्हणून हे काम : सोशल पोलिसिंग सेलमार्फत मदत

# बंदोबस्ताबरोबरच पोलीस बनले 'मदतदूत'

लोकमत न्यूज नेटवर्क




**पुणे :** लॉकडाऊनच्या काळात कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याबरोबरच पोलिसांना अनेक कामे करावी लागत आहेत. या काळात पोलीस केवळ रस्त्यावरच उतरले नाही, तर शहरातील अगदी उच्चभ्रू समाजातील लोकांपासून अगदी

रस्त्यावर राहणाऱ्या मजुरांपर्यंत समाजाच्या सर्व घटकांपर्यंत आपल्या मदतीचा हात वेगवेगळ्या मार्गाने पुरवित आहे. लोकांनी घरात राहावे म्हणून त्यांनी लोकांना झोडपले. लोकांना भररस्त्यावर उठाबशा काढायला लावल्या, याची चर्चा आणि व्हिडीओ खूप व्हायरल झाले. पण, त्यापुढे जाऊन गेले महिनाभर पोलीस सोशल पोलिसिंग सेलच्या माध्यमातून आतापर्यंत ६ लाख अन्न पाकिटांचे वितरण केले आहे.

अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोशल पोलिसिंग सेल २५ मार्चपासून कार्यान्वित झाला आहे. त्याचबरोबर आजवर कधीही न केलेली असंख्य कामे सध्या शहर पोलीस करीत आहेत. त्यासाठी शहरातील तब्बल १६३ स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधण्यात आला आहे. होम क्वारंटाईन केलेले सर्व घरीच राहत आहेत ना, याची दररोज तपासणी केली जात आहे. त्याचवेळी गेल्या दोन दिवसांपासून त्यांनी नवीन काम सुरु केले आहे.

शहरातील मध्यवस्तीत साडेतीन हजार देवदासी, ६०० तृतीयपंथी, हॉस्पिटलमध्ये दाखल असलेले व त्यांची देखभाल करणारे अशा सर्वांना पोलिसांमार्फत जेवण, फूड पॅकेट पुरविण्यात येत आहे. रस्त्यावर राहणाऱ्या १३६५ बेघरांना शेल्टरमध्ये सोय, त्यांच्या जेवणाची सोय केली आहे. ४९ मजूर कॅम्पमधील १७ हजार लोकांना मदत पुरविण्यात येत आहे.

डेक्कन जिमखाना, लॉ कॉलेज रोड, शिवाजीनगर या भागातील मोठ्या सोसायट्यांसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत भाजीपाला विक्रीचे व्यवस्थापन सुरु आहे. शहरातील ७६३ किराणा दुकानदारदारांशी ट्रॅक वॉच या संकेतस्थळावरुन ग्राहक आपली सामानाची यादी देऊन सामान घेऊ शकतात.

काही ठिकाणी आता घरपोच किराणा सामान पोहोचविण्याचा प्रयत्न सुरु आहे. पुण्यातील इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रतिनिधी आणि वेगवेगळ्या १९ डॉक्टरांच्या संघटना यांच्याशी सुसंवाद साधून कोरोनाव्यतिरिक्त इतर रुग्णांवर उपचार करण्यासाठी त्यांनी दवाखाने उघडे ठेवावेत, यासाठी डॉ. शिंदे यांनी व्यक्तिश: प्रयत्न केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

### नागरिकांना लॉकडाऊनमध्ये सहकार्याचे आवाहन

1. शहरातील ८00 पॉझिटिव्ह राहतात, मिनी हॉटस्पॉट त्यांच्या बाजूच्या प्रत्येकी १० घरांतील लोकांनी घरातच राहावे, यासाठी सॅनिटायझर, मास्क, साबण पुरविणे व साहित्यवाटप करण्यात येत आहे.
2. इतके करुनही लोक घराबाहेर पडत असल्याने वाहन रस्त्यावर आणणाऱ्यांनी पूर्वी केलेल्या वाहतूक नियमभंगाच्या गुन्हांच्या दंडवसुली करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांना सर्व आवश्यक ती काळजी घेण्यास सांगितले आहे. लोकांना रस्त्यावर प्रतिबंधित करण्याचा कायदेशीर उपाय म्हणून ही कारवाई आता सुरु असल्याचे डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.
3. शहरात इतके भीतीचे वातावरण असताना, लोकांच्या आजूबाजूला राहणारे कोरोनाबाधित झाल्याचे दिसून येत असताना आपल्याला काही होणार नाही, असे समजून लोक कसे घराबाहेर पडतात, याचेच आश्चर्य वाटत असल्याचे अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.



**Mata 11.04.20**

# देहविक्री करणाऱ्या महिलांना शिधावाटप

**पुणे :** बुधवार पेठेत राहणाऱ्या आणि देहविक्री करणाऱ्या महिला, वस्तीतील अन्य वृद्ध महिलांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समितीतर्फे जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. समाजातील दानशूर व्यक्तींनी यासाठी मदत केली असून, जेवण तयार करण्यासाठी एका संस्थेने जागा उपलब्ध करून दिली आहे.

जेवण शिजविण्याचे काम श्याम चंदनशिवे हे आचारी विनामूल्य करीत आहेत. त्यांच्या हाताखालील कामगारही नाममात्र मोबदला घेऊन ही सेवा देत आहेत. या कामासाठी एका कार्यकर्त्याने ४०० किलो तांदूळ दिला, तर अन्य एकाने मुबलक प्रमाणात गव्हाचे पीठ दिले आहे. मार्केट यार्डमधील व्यापाऱ्यांनीही मदत दिली. पुढील सुमारे २० दिवस या वस्तीतील ३०० महिलांना एक वेळचे जेवण मिळेल, एवढा शिधा संस्थेकडे जमा झाला आहे.



**Mata 15.04.20**

# गरजू महिलेला पोलिसांची मदत

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

क्षयरोगावर उपचारासाठी औंध येथील रुग्णालयात दाखल असलेल्या पतीला भेटण्यासाठी चार वर्षांच्या मुलासोबत निघालेल्या पत्नीला गस्तीवरील पोलिसांनी आर्थिक मदत केली. येरवडा पोलिसांकडून परिसरात गस्त सुरू असताना ही महिला आपल्या मुलासह रस्त्याच्या कडेला बसलेली पाहून चौकशी केली असता तिच्याकडे काहीच पैसे नसल्याचे समोर आले. या वेळी पोलिसांनी महिलेला औंध रुग्णालयात जाण्यासाठी रिक्षा उपलब्ध करून दिली. तिला खर्चासाठी काही पैसेही दिले. परभणीच्या रहिवाशी असलेल्या शांती आंबोरे यांच्या पतीवर औंध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यामुळे काही दिवसांपूर्वी त्या पतीसह पुण्यात आल्या होत्या. पोलिसांनी केलेल्या मदतीमुळे महिलेचे डोळे पाणावले होते. वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनूस शेख, सहायक निरीक्षक बलभीम ननावरे आणि कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन महिलेला रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली.

Lokmat 03.04.20

# विश्रांतवाडी पोलिसांसाठी मास्क व सॅनिटायझरवाटप

धानोरी : राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने विश्रांतवाडी पोलिसांना मास्क व सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले. राष्ट्रवादीचे बिनोद पवार यांनी या उपक्रमाचे संयोजन केले. यावेळी परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, विश्रांतवाडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम, सहायक पोलीस निरीक्षक संदीप यादव व पोलीस कर्मचारी अनिकेत भिंगारे उपस्थित होते. यासाठी विजय देसाई, सचिन शिंदे, नचिकेत साळवी, श्रीनिवास मेखला यांनी सहकार्य केले.

# कल्याणीनगरमधील २०० कुत्र्यांना जेवण

लोकमत न्यूज नेटवर्क

कल्याणीनगर : कल्याणीनगरमधील दोनशे कुत्र्यांच्या जेवणाची जबाबदारी कल्याणीनगर स्वयंसेवकांनी घेतली आहे. लॉकडाऊनमुळे भटक्या कुत्र्यांना अन्न मिळणे बंद झाले आहे. याबाबत मंजिरी राजगोपाल यांनी सांगितले, की आम्हाला या कामासाठी निशी चंदी रमाणी, प्रीती कोठारी, भारती उलल, नम्रता दीक्षित, शिवानी मोहिते असे अनेक स्वयंसेवक मदत करतात.

Pudhari 19.05.20

अशी शिस्त हवी...



Loksatta 24.05.20

# इन्फोसिस, पुणे पोलिसांकडून १० हजार मुखपट्ट्यांचे वाटप



लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी म्हणून ओळखली जाणारी इन्फोसिस कंपनी तसेच पुणे पोलिसांकडून प्रतिबंधित भागातील नागरिकांना मुखपट्टीचे वाटप करण्यात आले.

लोहियानगर, कासेवाडी भागातील नागरिकांना या उपक्रमाअंतर्गत दहा हजार मुखपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत प्रतिबंधित भागातील नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत आहे. इन्फोसिसमधील अधिकारी प्रवीण कुलकर्णी यांच्या हस्ते नागरिकांना मुखपट्ट्यांचे वाटप करण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे, डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहाय्यक आयुक्त प्रदीप आफळे, इन्फोसिसमधील सुरक्षा अधिकारी जोशी, खडक पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे, दत्ता पंडित आदी याप्रसंगी उपस्थित होते. मुखपट्ट्यांचे वाटप करताना गर्दी होणार नाही, याची काळजी घेण्यात आली. सामाजिक अंतर पाळून मुखपट्ट्यांचे वाटप करण्यात आले.

Pudhari 01.05.20

# गुन्हे शाखेतर्फे गरजू महिलांना किराणा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने लॉकडाऊन जाहीर केल्यानंतर बऱ्याच लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशाच काही गरजू महिलांना गुन्हे शाखेच्या युनिट तीनने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. इंदिरा वसाहत, निलगिरी लेन येथे पुनित बालन ग्रुपच्या मदतीने वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांनी व त्याच्या पथकाने धुणी-भांडी काम करणाऱ्या तसेच विधवा महिलांपर्यंत ही मदत पोहचवली.

**Loksatta 20.05.20**

# पोलिसांकडून गरजूंना १५ लाख जेवणाची पाकिटे

## ‘सोशल पोलिसिंग सेल’चा उपक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पनेतून टाळेबंदीत गरजूंना मदत करण्यासाठी ‘सोशल पोलिसिंग सेल’ या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाच्या माध्यमातून पोलिसांनी आतापर्यंत जेवण तसेच खाद्यपदार्थ मिळून १५ लाख १७ हजार ७८८ पाकिटांचे वाटप केले आहे.

‘सोशल पोलिसिंग सेल’कडून विशेष क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. एखाद्याला समस्येला सामोरे जावे लागत असेल, तर त्यांनी ‘सोशल पोलिसिंग सेल’च्या क्रमांकावर (मोबाइल क्र- ८८०६८०६३०८) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. टाळेबंदी लागू झाल्यानंतर पोलिसांनी शहरातील बेघर, परप्रांतीय कामगार, देहविक्रय करणाऱ्या महिला, रुग्णांचे नातेवाईक तसेच शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना नियमित जेवणाची पाकिटे उपलब्ध करून दिली आहेत.

आतापर्यंत १५ लाख १७ हजार ७८८ जेवणाच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले आहे. शहरात पूर्वांचलमधील विद्यार्थी वास्तव्यास आहेत. टाळेबंदीमुळे या विद्यार्थ्यांना घराबाहेर पडणे अवघड झाले होते. त्यांनाही जीवनावश्यक वस्तू तसेच जेवणाच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले. ससून रुग्णालय तसेच कमला नेहरू रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाइकांना जेवणाच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले.

शहरात अडकलेले परप्रांतीय नागरिक, मजूर, विद्यार्थी गावी रवाना होत आहेत. त्यांना पोलिसांकडून पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची पाकिटे, जंतुनाशके, मुखपट्टी उपलब्ध करून देण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यातील कर्मचारी गरजूंना मदत करत आहेत.

**Sakal 25.05.20**

# ...इथे खाकी वर्दीही गहिवरली

## लक्ष्मी बडे यांनी भागविली पादचारी मजुरांची भूक

**पुणे, ता. २४ :** रस्त्याच्याकडेला असलेल्या एका झोपडीत ती महिला एकटीच राहते. तिचे हक्काचे असे इथे कोणीच नाही. त्या दिवशी पाऊस आला, तेव्हा पोलिसांनी तिची विचारपुस करून तिला किराणा दिला. आता काही दिवसांचा तिचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला होता, पण तिने स्वतःच्या पोटापेक्षा गावी पायी निघालेल्या मजुरांना, त्यांच्या कुटुंबाला मायेचे दोन घास अन पाणी देऊन त्यांची भुक भागवित माणुसकीचे दर्शन घडविले !

हडपसर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोलिस कर्मचारी प्रशांत नरसाळे हे आपल्या सहकाऱ्यासह १५ मे रोजी सोलापूर रोड परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी आकाश लॉन्स जवळील रस्त्याच्याकडेला एका छोट्या पत्र्याच्या झोपडीत लक्ष्मी बडे या ५५ वर्षीय महिला एकट्याच राहात असल्याचे निदर्शनास आले. आदल्या दिवशी रात्री भरपूर पाऊस झाल्याने लोणारे, नरसाळे, बडे यांची विचारपुस करण्यास गेले. तेव्हा, बडे यांना यापूर्वी हडपसर पोलिस ठाण्याकडून किराणा सामान प्रदान करण्यात आले होते. त्या किराणा मालाचा उपयोग करून बनविलेले जेवण बडे या, गावाकडे पायी निघालेल्या भुकेल्या वाटसरुंना देत होत्या. त्यांना जेवणासह पाणी देऊन त्यांची हवे नको त्याची विचारपुस करीत होत्या.

बडे यांचेच हातावर पोट होते. पोलिसांनी दिलेला किराणा माल त्यांना किमान महिनाभर पुरला असता. परंतु दुसऱ्याकडून मिळालेल्या मदतीचा उपयोग स्वतःसाठी न करता बडे या भुकेल्या वाटसरूंसाठी करीत होत्या. बडे यांच्या या कृतीने लोणारे यांनाही गहिवरुन आले. त्यांनी बडे यांचे केवळ कौतुकच केले नाही, तर हडपसर पोलिस ठाण्याकडुन त्यांना पुन्हा एकदा किराणा सामान उपलब्ध करून देत त्यांच्या कार्याला सलाम केला.

**Pudhari 16.06.20**

# एकही कामगार उपाशी गेला नाही!

## सोशल पोलिसिंग सेल, ‘आयपीएसओडब्लूओ’ने परप्रांतीयांना पुरविले साहित्य

